REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 10 | JULY - 2022

# कोविड काळातील शालेय विद्यार्थ्यांचा अध्ययन व अध्यापन समस्या

**सौ. पूजा किरण कदम**
M.sc B.Ed
सहशिक्षिका, श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला विजापूर रोड ,सोलापूर.

## सारांश



जगात सर्वच क्षेत्रात दोन वर्षांपासून कोरोनाने (Corona) अहंकार माजवला होता. त्याचा परिणाम शिक्षण (Education) क्षेत्रावर ही मोठ्या प्रमाणावर झाला. भारताच्या शिक्षण प्रणालीमध्ये अनंत काळापासून शाळेत (School) किंवा खासगी क्लासमध्ये जाऊन शिक्षण घेण्याच्या पद्धतीला छेद देत ऑनलाईन शिक्षणाचा (Online Education) प्रयोग इच्छा व नियोजन नसताना करावा लागला... अर्थात त्याचा फायदा किती प्रमाणात झाला ही बाब चिंतनीय आहे. चालू शैक्षणिक वर्षात माध्यमिक व प्राथमिक विभागातील शिक्षण घेणाऱ्या मुलांना व त्यांच्या पालकांना, शिक्षकांना देखील हे वर्ष अनिश्चिततेचेच गेले. शाळा कधी उघडणार, किती क्षमतेने उघडणार, किती तासांसाठी उघडणार हे सर्व प्रश्न अधांतरी होते. परंतु जुलै २०२२ मध्ये त्याचा मुहूर्त लागला आणि इयत्ता १० वी व १२ वीचे वर्ग ५० टक्के क्षमतेने सुरु करण्यास परवानगी मिळाली. "शिक्षण हे एकमेव उन्नतीचे साधन आहे असे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "पण कोरोना ह्या जागतिक संकटामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी अस्वस्थता निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. आज आपला भारत देश प्रगतीच्या अती उच्च शिखराकडे वाटचाल करत असताना कोरोना विषाणू म्हणजे Covid-19 सारखे संकट जगभर महाथैमान घातले आहे. या विषाणूने सर्वच क्षेत्रात मोठ्या अडचणी निर्माण केलेल्या आहेत. कोरोनाच्या संकटासमोर जागतिक बलशाली महासत्ता असलेले राष्ट्र देखील हतबल झालेली आपल्याला दिसत आहेत. यात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी २२ मार्च २०२० पासून काही कालावधी साठी संपूर्ण देशात लॉकडाऊन करण्यात आला. शाळा, महाविद्यालये यांना सुट्टी देण्यात आली. दरम्यानच्या काळात कोरोनामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात व्यत्यय किंवा अडथळा येऊ नये विद्यार्थी हा शिक्षणाच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहू नये, म्हणून ऑनलाईन शिक्षणाचा मार्ग निवडण्यात आला. ऑनलाईन शिक्षणासाठी लागणारी सर्व साधने शहरातील किंवा श्रीमंत शिक्षीत पालकांच्या मुलांकडे होती किंवा आहेत. परंतु ग्रामीण भागातील गरीब शेतकरी कष्टकरी अशिक्षित पालकांच्या मुलांचे काय.गेल्या एक ते दिड वर्षांपासून शाळा व महाविद्यालय बंद आहेत परंतु शाळेतील विद्यार्थी असो की महाविद्यालयात उच्च शिक्षण घेणारा युवक विद्यार्थी असो त्यापर्यंत ऑनलाईन शिक्षणाची सोय साधन आजही नाहीत. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी अस्वस्थता निर्माण झालेली आपल्याला दिसत आहे.

**प्रस्तावना**

कोरोना पूर्व काळातील शैक्षणिक वर्षे आणि आत्ताचे ऑनलाईन शिक्षण यात खूप फरक आहे. कोरोना पूर्व काळातील प्रत्यक्ष शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होत होता . विविध परीक्षांमुळे विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता समजून येत होती. महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या क्रीडा स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकास होतो त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागतो शिक्षणाची व वाचणाची ओढ निर्माण होते. प्रॅक्टिकलच्या वेळेस तासंतास प्रयोग शाळेत उभे राहून नवीन नवीन प्रयोग करत विद्यार्थी हा विज्ञानाची कास धरत असतो विज्ञानाविषयाची निष्ठा व विज्ञानवादी विचार त्याच्या मनावर रुजत असतात. विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये मैत्रीपूर्ण संबंध तयार होत असतात. महाविद्यालयीन विद्यार्थी हा शिक्षकांचे अनुकरण करत व शिक्षकांच्या सहवासात मोठा होत असतो आणि उद्याचे भवितव्य तो आपले घडवत असतो. शिक्षकांचे प्रत्यक्ष वर्गात फळ्यावर शिकवत असतांना समजले नाही तर सरळ शिक्षकांना प्रश्न विचारण शिक्षकांशी होणाऱ्या गप्पा रोज सकाळी शाळेत गेल्यावर शिक्षकांना नमस्कार , शुभ सकाळ बोलणे मित्र मैत्रिणी याच्या सोबत आगाऊ पणा मजाकमस्ती करणे हे सर्व लॉकडाऊनच्या काळात बंद आहे...

कोरोना संकटात लॉकडाऊन मुळे इ. १०वी व १२वी सारख्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या वर्गातील परीक्षा देखील रद्द करण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान भरून काढणे म्हणजे परीक्षा पुढे ढकलने किंवा परीक्षा रद्द करणे नव्हे तर विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडणार नाही याची काळजी घेणे होय. कष्टकरी गरिब जनतेची मुले डोळ्यासमोर ठेवून शाळा बंदच्या काळात या समाजघटकातील मुलांचे शिक्षण कसे अखंडपणे चालू राहील याची योजना करायला हवी. कोरोना विषाणूची साथ हे दुसऱ्या महायुद्धानंतरचे जगासमोरचे मोठे संकट आहे. मानवी जीवनावर सर्वच बाजूने या संकटाने प्रभाव टाकला आहे. या रोगाला अजून प्रतिजैविके न सापडल्यामुळे रोग होऊ नये म्हणून प्रतिबंधक उपाय योजणे एवढाच आता सर्वासमोर पर्याय आहे.

अनेक देशांनी टी.व्ही माध्यमाचा वापर जास्त करायला सुरवात केली आहे. भारतात नऊशेहून अधिक चॅनेल्स आहेत व घरी बसलेल्या विद्याथ्यांसाठी या चॅनेलचा वापर कसा करून घेता येईल याबद्दल शिक्षण खात्याकडून पावले उचलली जाणे आवश्यक आहे. १५ जून पासून राज्य शासन व शिक्षण विभागानाचे अधिकारी यांनी ऑनलाईन शिक्षण शाळा सुरु होण्याच्या पहिल्या दिवसापासून अध्यापन सुरू आदेश दिले आहेत परंतु स्थानिक पातळीवरील येणाऱ्या अडचणींचे काय.

शाळेच्या प्रांगणात खेळणारी बहरणारी शिकणारी सहशिक्षणातून आनंददायी वातावरणात नवनव्या संकल्पना शिकत स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा विकास करणारी मुल ऑनलाईन शिक्षण खरच शिकत आहेत का... किंवा शिकली आहेत का...? हा खुप मोठा प्रश्न शिक्षण व्यवस्थेपुढे ,समाजापुढे, पालकांपुढे आणि शिक्षकांपुढे उभा आहे.

शासनाने प्रत्येक शाळा व महाविद्यालयाचे ऑनलाईन वर्गात किती विद्यार्थी हजर राहतात याची माहिती मागवावी म्हणजे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आपल्याला नेमकी कळेल व त्यानंतर जो विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण घेऊ शकत नाही अशा विद्यार्थी पर्यंत आपल्याला शिक्षण कसे पोहचवता येईल जेणेकरून तो शिक्षणाच्या प्रवाहात आला पाहिजे. कोरोनाच्या घालून दिलेल्या नियमाच्या अधिन राहून शिक्षक स्वतः विद्यार्थी पर्यंत पोहचून शिक्षण देऊ शकतात. या सर्वांचा विचार करून सरकारने आता या बद्दल निर्णय घेणे आवश्यक आहे. " कारण शिक्षण आहे मला तुम्हाला आणि सर्वांना संविधानाने दिलेला अधिकार" सध्या कोरोनाच्या जागतिक संकटामुळे शाळा बंद आहेत. शाळा सुरु करण्याजोगी परिस्थिती कधी निर्माण होईल, हे आज सांगता येणे कठीण आहे. शाळा सुरु झाल्याच तरी, सामाजिक अंतराचे नियम काय असतील आणि ते पाळून शाळा पूर्ववत चालवता

येतील का, हेही सांगता येणे कठीण आहे. सरकारने शाळा 'ऑनलाईन' सुरु करायला परवानगी दिली आहे. अनेक शाळांनी कोणत्या ना कोणत्या पद्धतीचे, ऑनलाईन उपक्रम सुरु देखील केले आहेत. पण, या साऱ्याची पुढील दिशा काय असेल? याचा विचार गांभीर्याने करायला हवा.

आपल्याकडे मोबाईल, लॅपटॉप अशी उपकरणे वापरून, आपण अनेक गोष्टी करतोपण या माध्यमांचा वापर करून . शाळा किंवाकोणत्याही प्रकारचे शैक्षणिक उपक्रम चालवणे, हे आपल्यासाठी पूर्णपणे नवीन आहेकोरोनामुळे लादल्या . पण या ऑनलाईन शिक्षणाची आजची .गेलेल्या सक्तीच्या सुटीमुळे हे ऑनलाइन माध्यम एकाएकीच आपल्या गळ्यात पडले परिस्थिती काय आहे? त्यासाठी कोणते पर्याय उपलब्ध आहेत? ते आज कोणत्या प्रकारे वापरले जात आहेत? या सगळ्याचे भविष्य काय असेल? या प्रश्नांचा उहापोह करताना, सर्वात महत्त्वाचे म्हणजे या साऱ्यातून आपल्याला नक्की काय साध्य करायचे आहे? ते समजून घ्यायला हवे.

## शिक्षणाचे घटक

साधारणतः शिक्षणाचे तीन प्रमुख घटक असतात. अध्यापन (teaching), अध्ययन (learning) आणि मूल्यमापन (evaluation) या तीन घटकांसाठी शिक्षणप्रक्रिया राबविली जाते. आता हे तीनही घटक या नव्या ऑनलाईन पद्धतीत कसे आकार घेतील ते पाहूया.

**अध्यापन (training) :** शिक्षक वर्गामध्ये जे शिकवतो ते अध्यापन. यामध्ये शिक्षकाचे व्यक्तिगत कौशल्य, वक्तृत्व, विषय मांडण्याची आणि समजावून सांगण्याची कला हे अंतर्भूत असते.

**अध्ययन (learning) :** विद्यार्थी स्वतःच्या प्रयत्न आणि आकलनाने जे शिकतात ते अध्ययन. यामध्ये शिक्षकांनी सांगितलेली अभ्यास सामग्री (study material) वाचणे, संबंधित अध्ययन साधने (learning resources) बघणे / अनुभवणे, दिलेला गृहपाठ (homework / assignments) करणे यांचा समावेश असतो.

**मूल्यमापन (evaluation) :** अध्यापन आणि अध्ययनातून विद्यार्थी किती शिकला आहे, याची पडताळणी करणे म्हणजे मूल्यमापन. यामध्ये गृहपाठाची तपासणी करणे, घटक चाचण्या घेणे आणि परीक्षा घेणे यांचा समावेश असतो.

ऑनलाईन शिक्षणाचा विचार करताना, हे तीनही घटक ऑनलाईन माध्यमांमधून पूर्ण करता येतील अशी व्यवस्था किंवा प्रणाली वापरायला हवी.

## सध्याची परिस्थिती

सध्याची परिस्थिती बघता बहुसंख्य शाळा अथवा प्रशिक्षक फक्त 'अध्यापन' ऑनलाईन करण्यावर भर देत आहेत, असे दिसत आहेझूम किंवा गूगल मीट सारखे तंत्रज्ञान वापरून शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा व्हिडियो कॉल सेटअप करणे आणि . त्यात शिक्षकांनी वर्गात बोलतात, त्याप्रमाणे बोलून शिकवणे अशी सध्याच्या बहुसंख्य ऑनलाईन वर्गांची परिस्थिती दिसत आहेकाही क .ल्पक शिक्षक आपल्या लेक्चरचे पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन करून, ते व्हिडियो कॉलवर दाखवतात आणि विषय समजावून सांगतातकाही शिक्षक फळा समोर ठेवून ., त्यावर वर्गात शिकवत असल्यासारखे खडूने मुद्दे लिहून शिकवतातततर . अर्थात .काहीजण नुसतंच व्हिडियो कॉलवर बोलल्यासारखे बोलतात, यात शिक्षकांचा काही दोष आहे, असे मला वाटत नाही . शिक्षकांचे सर्व प्रशिक्षण हे वर्गात शिकवण्याच्या दृष्टीने झालेले असताना आणि वर्गात शिकवण्याचाच अनुभव त्यांच्यापाशी असताना अचानक ऑनलाईन अध्यापन करावे लागणे, हा त्यांच्यासाठी प्रचंड मोठा बदल आहेयासाठी त्यांचं . प्रशिक्षण झालेले नाही .(किंवा अगदी कमी वेळात तशी तयारी त्यांना करावी लागली आहे)

दुसऱ्या घटकाचा, अध्ययनाचा, विचार केला, तर त्यासाठी आज प्रामुख्याने पारंपारिक साधने आणि पद्धतीच वापरल्या जात आहेतअध्ययनाचे पारंपारिक साधन म्हणजे पाठ्यपुस्तक आणि पद्धत म्हणजे . पुस्तकातले धडे वाचून त्याखालची प्रश्नोत्तरे सोडवणेखरेतर कोणताही विषय शिकण्यासाठी आजच्या ऑनलाईन जगात प्रचंड मोठ्या प्रमाणावर . युट्यूबवरचे व्हिडियोज .रिसोर्सेस उपलब्ध आहेत, विकिपीडियासारखे माहितीचे संग्रह इथपासून ते अनंत ब्लॉग्ज आणि माहितीचे संकलन करणाऱ्या वेबासाईट्स उपलब्ध आहेतअसे असताना अध्ययनासाठी फक्त पाठ्यपुस्तकावर अवलंबून . रहाणे, हे शिक्षण मर्यादित चाकोरीमध्ये अडकवून ठेवण्यासारखे आहेकाही शाळांमधले काही शिक्षक ., अशी साधने वापरायला मुलांना प्रोत्साहन देत आहेत (रिसोर्सेस), मात्र बहुसंख्य ठिकाणी ऑनलाईन माध्यमाचा प्रभावी वापर करून, अध्ययन पाठ्यपुस्तकापलिकडे नेण्याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे.

मूल्यमापनाची पारंपारिक पद्धत म्हणजे वेळोवेळी घेतल्या गेलेल्या चाचण्या आणि परीक्षाछोट्या चाचण्यांसाठी . ) ऑनलाईन माध्यमांमध्ये स्पर्धाQuiz), सर्वेक्षण )Survey) किंवा मतचाचणी )Polls) सारखी तंत्र वापरता येऊ शकतात किंवा गूगल फॉर्मस वापरून मुलांकडून प्रश्नोत्तरे मागवता येऊ शकतातपेन या -सध्या मात्र मूल्यमापनासाठी कागद . शिक्षकांनी प्रश्नोत्तरे स्कॅन करून पाठवणे .पारंपारिक साधनांचाच वापर होताना दिसत आहे, त्याचा प्रिंटआउट काढून त्यावर ती सोडवणे आणि ते स्कॅन करून शिक्षकांना परत पाठवणे किंवा वहीत प्रश्नोत्तरे लिहून, त्याचा फोटो शिक्षकांना पाठवणे हे बहुसंख्य ठिकाणी केले जाताना दिसत आहे.

एकूणात, अध्यापन, अध्ययन आणि मूल्यमापन या शिक्षणाच्या तीन अंगांपैकी प्रामुख्याने अध्यापन ऑनलाईन केले जाताना दिसत आहेपरंतु तिथेही ऑनलाईन माध्यमाची पूर्ण क्षमता वापरली जात आहे ., असे दिसत नाही.

## ऑनलाईन शिक्षणाचे फायदे

ऑनलाईन शिक्षणाच्या प्रणालीची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी झाली तर, त्याचा अनेक स्तरांवर फायदा होऊ शकतोज्ञानदानासाठी किंवा क्षमताविकसना .साठी, एका शारिरीक वयाच्या ५०मुलांना एका छताखाली रोज जमवून १००-, त्यांना एकाच पद्धतीचे शिक्षण देणे ही औद्योगिक काळाची )Industrial Age) ची गरज होतीकेवळ त्याच पद्धतीने शिक्षण . पण अगदी कोरोना येण्यापूर्वीपर्यंत या परिस्थितीत काहीसा फरक .देणे तेव्हा शक्य होतेपडला नव्हताकोरोनाच्या या . .झटक्याने आपण अचानक नव्या पद्धतीत आलो आहोत

भविष्यात या नव्या ऑनलाईन शिक्षण पद्धतीत प्रत्येकासाठी व्यक्तिगत शिक्षणाचे नियोजन (लर्निंग प्लॅन), शिक्षणाचा मार्ग (लर्निंग पाथ) असू शकतात. वयानुसार आणि व्यक्तिगत क्षमतेनुसार त्या नियोजनामध्ये लवचिकता येऊ शकते. म्हणजे दहा वर्षांचे एक मूल त्याच्या नैसर्गिक क्षमतेनुसार, चौथीचे तर दुसरे मूल त्याच्या क्षमतेनुसार सातवी-आठवीचे गणित शिकू शकते. हे आज घडत नाही, पण उद्या कदाचित असे घडू शकेल. प्रत्येकजण आपापल्या क्षमतेनुसार आणि आवडीनिवडीनुसार आपल्या शिक्षणाचा मार्ग निवडू शकेल.

शाळा चालवण्यासाठी शाळेच्या इमारती, मैदाने यांचे इन्फ्रास्ट्रक्चर लागते. शहरांपासून ते खेड्यांपर्यंत प्रत्येक मुलाच्या घराजवळ शाळा हवी असेल तर त्यासाठी लागू शकणाऱ्या इन्फ्रास्ट्रक्चरसाठी महाकाय गुंतवणूक करावी लागते. शाळा घराजवळ नसेल तर, मुलांच्या वाहतुकीची व्यवस्था आणि त्यासंबंधी इन्फ्रास्ट्रक्चर लागते. वाहतुकीमध्ये मुलांचा जाणारा वेळ आणि त्या दरम्यानच्या त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ही देखील एक मोठी समस्या असते. अत्यंत प्रभावीपणे

चालवल्या गेलेल्या ऑनलाईन शिक्षणामुळे या समस्यांचे निराकरण होऊ शकते. शाळांच्या इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणुक न करता, शिक्षण सर्वदूर पोहोचवता येऊ शकते.

## ऑनलाईन शिक्षणाच्या मर्यादा

शाळांमध्ये मुले पारंपारिक शिक्षणासोबत सामाजिक वर्तन (सोशल स्किल्स) सुद्धा शिकत असतात. कोणत्याही व्यक्तीच्या जडणघडणीमध्ये तो जिथे शिकतो तिथल्या वातावरणाचा, संगतीचा आणि सोशल स्किल्सचा अत्यंत महत्वाचा वाटा असतो. पूर्णपणे ऑनलाईन असलेल्या शिक्षण पद्धतीमध्ये मुलांनी आपल्या समवयीन मुलांमध्ये गटाने एकत्र रहाणे, एकमेकांशी मैत्री करणे, मैदानात एकत्र खेळणे, दंगामस्ती करणे इत्यादी गोष्टी घडत नाहीत. या सगळ्यातून आपोआप शिकले जाणारे सामाजिक वर्तनाचे नियम, सामाजिक शिस्त आणि संबंधित सोशल स्किल्स ही ऑनलाईन शिक्षणातून देता येत नाहीत. ऑनलाईन शिक्षणाची ही सगळ्यांत मोठी मर्यादा आहे.

शालेय शिक्षणात काही उपक्रम हे प्रत्यक्ष उपस्थित राहून आणि शिक्षकांच्या देखरेखीखालीच करावे लागतात . अशा प्रकारचे प्रयोगशाळांमधून दिले जाणारे शिक्षण ऑनलाईन .प्रयोगशाळांमध्ये केलेले प्रयोग हे याचे ठळक उदाहरण आहे माध्यमांमधून देता येणे अत्यंत अवघड, कदाचित अशक्य आहे.

याचबरोबर, ऑनलाईन शिक्षणासाठी शिक्षक आणि विद्यार्थी दोघांकडेही पुरेशा क्षमतेची तांत्रिक उपकरणे स्मार्टफोन्स), टॅब्लेट्स, लॅपटॉप्स इत्यादीआणि पुरेशी बँडविडथ असलेले आणि सतत सुरु असलेले हाय स्पीड इंटरनेट ( विद्यार्थी आणि शिक्षका यातली पुरेशा क्षमतेची तांत्रिक उपकरणे सर्व .असणे गरजेचे असतेंकडे असतातच, त्यांना ती परवडतातच असे नाहीग्रामीण भाग ., शहरी कनिष्ठ आणि निम्नमध्यमवर्ग सोडा, अगदी मध्यमवर्ग आणि उच्च मध्यमवर्गातही मुलांना त्यांच्या मालकीचा स्मार्टफोन किंवा लॅपटॉप देणे सगळ्यांनाच शक्य नसते.

याच बरोबर सर्वदूर पोचलेली, सदैव उपलब्ध असलेली पुरेशी इंटरनेट कनेक्टिविटी ही आपल्याकडची मोठी समस्या आहे मोबाईलच्या .3G/4G सेवा काही ठिकाणी जोमात चालतात तर काही ठिकाणी केवळ नावाला उपलब्ध असतातवायर्ड . ब्रॉडबँड आणि फायबर ऑप्टिक जिथे आहेत तिथे कमालीचे चालतात, जिथे नाहीत तिथे कधी पोचतील सांगता येत नाही.
म्हणजे ऑनलाईन शिक्षण ज्यावर मिळतं ती उपकरणे हातात नाहीत आणि ज्याद्वारे मिळते त्या कनेक्टिविटीची खात्री नाही, अशी बहुसंख्य विद्यार्थ्यांची अवस्था आहे.

## सरकारची भूमिका, उपक्रम आणि धोरण

केंद्र सरकारने ईलक प्रसारासाठी काही-लर्निंग च्या प्रचार-्षणीय उपक्रम गेल्या काही वर्षांमध्ये सुरु केले आहेत . ‘स्वयम’ नावाचे ॲप आणि त्या मागे असलेली शैक्षणिक साहित्य निर्माण करणारी मोठी परिसंस्था सरकारने उभी केली आहे . AICTE, NCERT, UGC सारख्या राष्ट्रीय पातळीवरच्या ९ संस्थांमध्ये समन्वय साधून त्यांच्याकडील शैक्षणिक साहित्य ‘स्वयम’ या एका व्यापीठावर उपलब्ध करून दिले आहेशिवाय कोणत्याही शिक्षकाला कोणत्याही विषयावरचा अभ्यासक्रम . आणि शैक्षणिक साहित्य तयार करून, त्यावर टाकण्याची सुविधा दिली आहे .‘स्वयम’मधील सर्व अभ्यासक्रम आणि शैक्षणिक साहित्य हे देशातील कोणाही विद्यार्थ्याला पूर्णपणे मोफत उपलब्ध आहे.

ई-लर्निंगच्या प्रचाराप्रसारासाठीचा केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास खात्याचा हा अत्यंत महत्वाकांक्षी - संशोधन लर्निंग संबंधीचे-याच बरोबर केंद्र सरकारचे माहिती तंत्रज्ञान खाते देशभरातल्या अनेक संस्थांमध्ये ई .प्रकल्प आहे प्रकल्प गेली काही वर्षे राबवत आहे आणि केंद्र सरकारने स्थापन केलेल्या राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षा संस्था )National Institute of open schooling) द्वारे अनेक पारंपारिक किंवा व्यावसायिक शिक्षणाचे अभ्यासक्रम ऑनलाईन चालवले जात आहेत.

मात्र शिक्षण व्यवस्थेमधल्या, अध्यापन, अध्ययन आणि मूल्यमापन या तीन बाजूंपैकी सरकारचा भर प्रामुख्याने अध्ययनावर सध्या अस्तित्वात असलेल्या शाळा आणि शैक्षणिक संस्थांनी .आहे असे सध्या दिसत आहे (लर्निंग-ई) केमध्यअध्यापनासाठी ऑनलाईन माध्यमांचा वापर कसा करावा यासाठी सरकारी धोरणे आणि भूमि े स्पष्टता दिसत नाही . खासगी आणि सरकारी शाळांमधील शिक्षकांना ऑनलाईन अध्यापन करण्यासाठी उपकरणे कशी उपलब्ध करून द्यावीत, ती वापरण्याचं प्रशिक्षण त्यांना कसे द्यावे याविषयी धोरणे अथवा मार्गदर्शक तत्वे स्पष्टपणे जाहीर झालेली नाहीतकेंद्र सरकार ., विविध राज्य सरकारं आणि शैक्षणिक संस्था आपापल्या पातळ्यांवर एकाच समस्येवर वेगवेगळी उत्तरे शोधत असताना दिसत आहेतया सर्व प्रयत्नांमध्ये सुसूत्रता आणणे आणि ऑनलाईन शिक्षणासाठी राष्ट्रीय पातळीवर सर्वसमावेशक असा . .दूरगामी महत्वाचा कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे

## संमिश्र शिक्षण हीच भविष्याच्या दिशा

ऑनलाईन शिक्षण व्यवस्था ही काळाची गरज आहेअत्यंत कमी खर्चात प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचू शकेल ., आणि प्रत्येकाला आपापल्या आवड आणि क्षमतेनुसार घेता येईल असे शिक्षण खरोखर महत्वाचे आहेमात्र ., ऑनलाईन शिक्षणाच्या काही महत्वाच्या मर्यादांमुळे पारंपारिक शालेय शिक्षण आणि शाळांना तो संपूर्ण पर्याय ठरेलच असे नाहीसंमिश्र शिक्षण . ) पद्धतBlended Learning) ही भविष्यातली महत्वाची शिक्षण पद्धत असेलजे विषय ऑनलाईन शिकता येणे शक्य आहे . एकत जे विषय प्रत्यक्ष .अध्ययन ऑनलाईन होणे-त्यांचे अध्यापन ्र येऊनच शिकावे लागतात त्यासाठी शाळांसारख्या संस्थांमध्ये एकत्र येणे, अशा दोन्ही पद्धतींचा वापर येणाऱ्या काळात करावा लागेलत्याचबरोबर मूल्यमापनाच्या पद्धतींमध्ये . सप्रमाणीकरण करून त्या ऑनलाईन पद्धतीने राबवल्या तर देशातल्या कोणालाही कुठूनही हव्या त्या अभ्याक्रमाची परीक्षा देता येणे शक्य होईल. या सर्व एखाद दुसऱ्या वर्षात घडणाऱ्या गोष्टी नाहीतवर्षानुवर्षे अनेक सरकारी आणि खासगी संस्थांनी . एकमेकांशी समन्वय साधत प्रयत्न केले तर संपूर्णपणे आधुनिक आणि सर्वांना उपलब्ध अशी नवी शिक्षण व्यवस्था आपण उभी .करू शकू

कोरोना आणि त्यामुळे आलेल्या टाळेबंदीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. करोनानंतरच्या काळात शाळा कशा असतील, याची चर्चा आता विविध व्यासपीठांवरून घडत आहे. त्यात प्रामुख्याने ऑनलाइन शिक्षण या मुद्द्यावर भर आहे. पण त्यापाठोपाठ असेही प्रश्न उपस्थित होत आहेत की, या चर्चेची एवढी घाई कशाला? अशा ऑनलाइन मंचांची खरोखर गरज आहे का? अशा व्यवस्थेसाठी लागणा-या पायाभूत सुविधा आपल्याकडे आहेत का? लहान मुलांना मोकळे का सोडले जात नाही? इत्यादी इत्यादी. कोव्हिड१९ ने सर्वच क्षेत्रांपुढे काही मूलभूत प्रश्न उभे केले आहेत. त्यास शैक्षणिक क्षेत्रही अपवाद नाही. कोरोनानंतरच्या काळात शैक्षणिक सत्रे सुरळीत सुरू करण्याबरोबरच मुलांनाही सुरक्षित ठेवण्यावर भर दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर ऑनलाइन शिक्षणावर भर दिला जात आहे. आपण हे तंत्रज्ञान आत्मसात करायला हवे, अशा आशयाच्या चर्चा

**सुरू आहेत. या सर्व गोष्टींचा उहापोह करण्याची हीच वेळ आहे.** माहिती तंत्रज्ञानामुळे शिक्षणाचा प्रसार शिक्षणाचा विस्तार, शिक्षणाचा दर्जा, शिक्षणाची संधी वाढविण्यास भरपूर वाव आहे. असे वाटते परंतु "ट्राय" च्या अहवालानुसार भारतात२०२० मध्ये इंटरनेट वापरणार्यांची संख्या६८.४६ कोटी आहे मोबाईल फोन वापरणार्यांची संख्या४८.८२कोटी आहे तर इंटरनेट सह स्मार्ट फोन वापरण्याची संख्या४०.७२ कोटी आहे तर T.V पाहणार्यांची संख्या ७६ कोटी इतकी आहे हा माहिती तंत्रज्ञानाचा विस्तार झालेला दिसत असला तरी त्यात प्रचंड प्रमाणात विषमता आहे भारतात ५२% जनता इंटरनेटचा वापर करते म्हणजे निम्मा भारत आजही इंटरनेटच्या लाभापासून वंचित आहे ग्रामीण भागात ३६% जनता व शहरात ६४ % जनता इंटरनेटचा वापर करते तर ६७% पुरुष व ३८% स्त्रिया भारतात इंटरनेटचा वापर करतात. माहिती तंत्रज्ञान हे शहरी, सधनवर्ग व पुरुष यांचीच सध्यातरी मक्तेदारी होत आहे. त्यामुळे "नॅशनल डिजिटल लायब्ररी", "स्वयम ", "शोध गंगा", इ. सरकारी प्रकल्पांचा फायदा मर्यादित होत आहे या प्रकारच्या ऑनलाईन शिक्षणात कम्प्युटरची किंमत, इंटरनेटचा खर्च, विजेचा पुरवठा. इ. प्रमुख अडचणी आहेत. त्यामुळे ऑनलाईन शिक्षण ही चैन शहरातील सधनवर्गाला परवडते.!

## निष्कर्ष –

या परिस्थितीतून निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे जगभर भितीचे वातावरण आहे. जागतिक व देशाच्या अर्थव्यवस्था लॉकडाऊनमुळे बेरोजगारीच्या विळख्यात अडकल्यामुळे डळमळीत झालेली आहे. ठप्प झालेल्या अर्थव्यवस्थेमुळे हातावर पोट असणाऱ्या कष्टकरी शहराकडून गावाकडे निघाले आहेत कोरोना संकटामुळे अनेक देशातील शिक्षण संस्था देखील बंद आहेत "युनेस्को" च्या अहवालानुसार एप्रिल२०२० मध्ये १८८ देशात १५४ कोटी विद्यार्थी घरी बसले आहेत. भारतात १५ लाख शाळा बंद आहेत. त्यामुळे २६ कोटी विद्यार्थी व ८९ लाख शिक्षक घरी बसले आहेत तर उच्च शिक्षणात ५० हजार शिक्षणसंस्था बंद आहेत व ३.७० कोटी विद्यार्थी आणि १५ लाख महाविद्यालयीन शिक्षक घरी बसले आहेत. म्हणजे एकूण ३० कोटी विद्यार्थी घरी बसले आहेत. कोरोनाची समस्या ही केवळ आरोग्याची समस्या आहे असे मानले जाते. पण या संकटाला शैक्षणिक समस्यांची बाजू आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. लोकांचे एकटेपण घालवण्यासाठी रामायण, महाभारत या सारख्या मालिका दुरदर्शनवर दाखवून भूतकाळातल्या आभासी जगात जनतेला रमवून वर्तमानातील समस्यांवर मात करता येणार नाही.युनेस्को ने शाळाबाह्य झालेल्या विद्यार्थ्यांच्या समस्येवर तातडीने मार्ग काढणाच्या सुचना आपल्या सभासद देशांना दिल्या आहेत. शिक्षणात आलेल्या या व्यत्ययाने मुलांना शिक्षण हक्कापासून वंचित राहावे लागत आहे असे मत "युनेस्को" ने नोंदविले आहे. कोरोना काळात शिक्षण बंद न करता त्यासाठी नवे मार्ग शोधण्यासाठी गरज निर्माण झाली आहे म्हणून गरिब विद्यार्थ्यांचे शिक्षण न थांबता पर्यायी मार्ग शोधणे हेच आजच्या काळातील आव्हान व गरज आहे...

दुरशिक्षण माहिती तंत्रज्ञानाचा वापर, यू-ट्यूब, हँगआउट, मल्टिमीडीया ,मोबाईल फोन ई-लायब्ररी, दुरदर्शन इ. माध्यमातून अनेक देशांनी तातडीने मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये म्हणून वरील प्रकाराच्या माध्यमातून शिक्षण देत आहेत. परिस्थितीची अनिश्चितता लक्षात घेतली तर आपल्या देशाने सुद्धा दीर्घ काळासाठी शैक्षणिक धोरण ठरविणे आवश्यक आहे. आपल्या देशात उच्च शिक्षणात व मेडिसिन, इंजिनेअरिंग ,कॉमर्स व मॅनेजमेंट यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमात माहिती तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो विद्यार्थी. आर्थिक दुष्ट्या वरच्या स्तरातील असल्यामुळे लॅपटॉप,इंटरनेट इ. खर्च त्यांना परवडतो. त्यामुळे प्रामुख्याने अभिजन वर्गाच्या छोट्या गटांचा अभ्यास ऑनलाईन चालू आहे. हाच अनुभव शालेय शिक्षणातही आहे ज्या उच्च मध्यमवर्गीय यांची मुले सर्व सोयीने युक्त अशा पंचतारांकित शाळेत जात आहेत, त्यांचेही ऑनलाईन

शिक्षण चालू आहे. समस्या आहे ती मात्र बहुसंख्य कष्टकरी, गरिब वर्गातील मुलांची भटके विमुक्त अदिवासी ग्रामीण भागांतील सरकारी किंवा अनुदानित शाळेत जाणाऱ्या मुला मुलींची.!

## संदर्भ


- युनायटेड स्टेट्समधील सामाजिक-अंतर वर्तनावर कोविड-19 धोरणांचा तात्काळ परिणाम. सार्वजनिक आरोग्य प्रतिनिधी
- वैयक्तिक डेटाचे संरक्षण आणि डिजिटल अधिकारांची हमी. येथे ऑनलाइन उपलब्ध
- अँड्रयूज, जे. एल., फॉल्केस, एल., आणि ब्लेकमोर, एस. जे. (२०२०). पौगंडावस्थेतील समवयस्क प्रभाव:
- उच्च शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या जीवनावर कोविड-19 महामारीचे परिणाम: जागतिक दृष्टीकोन. टिकाऊपणा
- बनिया, जे. आणि बॅनर्जी, आय. उच्च शिक्षणावर कोविड-19 चा प्रभाव: एक गंभीर पुनरावलोकन.
- भूमिका. कोविड-19 मुळे देशव्यापी लॉकडाऊन दरम्यान कार्य-जीवन संतुलनासाठी आव्हाने:
- ब्राउनिंग, एम. एच., लार्सन, एल. आर., शराईव्हस्का, आय., रिगोलॉन, ए., मॅकअनिर्लिन, ओ., मुलेनबॅच, एल., एट अल. (विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये कोविड-19 चे मानसिक परिणाम: युनायटेड स्टेट्समधील सात राज्यांमधील जोखीम घटक.